# उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय

सेनापती बापट मार्ग, सिम्बायोसिस कॉलेज समोर, पुणे-४११ ००४

ई-मेल : dycfpune@mahaforest.gov.in

दूरभाष क्रमांक : ०२० २५६६ ०५९३


**सुधारित पत्र**

विषय:- Diversion of 39.25 ha of Reserved Forest / Deemed Reserved Forest land in favour of M/s Maharshi Vedic Health Private Ltd. for Ayurvedic Medicines and Treatment Center in Village- Wahangaon Tal- Maval Dist- Pune in the State of Maharashtra- Regarding

जा.क्र.ब/कक्ष-४-२/जमीन/एफसीए-९८/६४३/२०१९-२०.

पुणे - ४११ ००४, दि. ०२/०२/२०२०. ०३

प्रति,

श्री. जय हनुमंत ढमे,
महर्षि वैदिक हेल्थ प्रा. लि.,
सी-१०, अभिमानश्री सोसायटी,
बाणेर रोड, पुणे- ४११ ००८.

संदर्भ- १. केंद्र शासनाचे पत्र क्र. FC-II/MH-११९/२०१९-NGP/६१६०, दि. ०३/०२/२०२०.

२. उपवनसंरक्षक वन (संवर्धन), प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म. रा. नागपूर यांचेकडिल पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/२/आयडी/१२७५२/१८२३, दि. ०५/०२/२०२०.

३. वरील संदर्भ क्र. २ चे पत्र मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा), पुणे यांचे कार्यालयाकडून दि. १२/०२/२०२० रोजी ईमेल व्दारे या कार्यालयास प्राप्त.

४. या कार्यालयाचे पत्र क्र.ब/कक्ष-४-२/जमीन/एफसीए-९८/६२३, दि. १५/०२/२०२०.

५. प्रकल्प यंत्रणेकडिल दि. २७/०२/२०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मौ. वाहनगाव ता. मावळ जि. पुणे येथील राखीव वन ग. नं. ५४, ७४, ७६ व खाजगी वन ग. नं. ५५, ५६ मधील ३९.२५ हे. वनक्षेत्रामध्ये मे. महर्षि वेदिक हेल्थ प्रा. लि. यांना आयुर्वेदिक मेडिसिन्स व ट्रिटमेंट सेंटर साठी वनक्षेत्र वळतेकरण करण्यास केंद्र शासनाने वरील संदर्भ क्र. १ अन्वये काही अटींचे अधिन राहून तत्वत: (Stage-I) मंजूरी प्रदान केली आहे. सोबत संदर्भीय पत्राची छायांकित प्रत जोडली आहे.

त्याअनुषंगाने आपणास वरील संदर्भ क्र. ४ अन्वये Demand Note नुसार अटी पुर्तता अहवाल सादर करणेबाबत कळविण्यांत आले होते तथापि सदर Demand Note अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचे कार्यालयाकडून फेटाळण्यांत आलेबाबत वरील संदर्भ क्र. ५ अन्वये या कार्यालयास कळविण्यांत आलेले आहे. तरी याबाबत वरील संदर्भ क्र. १ अन्वये घातलेल्या खालील अटींची पूर्तता करुन सुधारित पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

| अट क्र. | अट | करावयाची पूर्तता |
|---|---|---|
| i | Legal status of the forest land shall remain unchanged; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| ii | Forest land will be handed over only after required non-forest land for the project is handed over by the User Agency | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| iii | **Compensatory afforestration**<br>a. Compensatory afforestation shall be taken up by the Forest Department over 41.5262 ha non-forest land (Gut. No. 1631, 1648/1, 1649/4, 166 1/1, 1662, 1664, 1665, 1674, 1675, 1676 in Village- Tiware, Tal. Chiplun, Dist. Ratnagiri) at the cost of the User Agency. As far as possible, a mixture of local indigenous species shall be planted and monoculture of any species may be avoided; | पर्यायी वनीकरणासाठी मौ. तिवरे ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथील वनेत्तर ग. नं. १६३१, १६४८/१, १६४९/४, १६६१/१, १६६२, १६६४, १६६५, १६७४, १६७५, १६७६ मधील एकुण ४१.५२६२ हे. प्रस्तावीत करण्यांत आलेले आहे. त्यामध्ये पर्यायी वनीकरणांतर्गत वनीकरण करणेसाठी लागणारा खर्च हा मॉडेल नं. ५ मा. मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांचेकडिल पत्र क्र. कक्ष-१७/मुले/अंदाजपत्रक/प्र.क्र.४०/११२७, दि. ०४/१०/२०१९ अन्वये **सन २०१९-२० नुसार** प्रती हेक्टर रक्कम रूपये ६,६२,१८०/- प्रमाणे ४१.५२६२ हे. साठी **रक्कम रूपये २,७४,९७,८१९/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी चौ-याहत्तर लाख सत्यान्नव हजार आठशे एकोणीस फक्त) इतकी रक्कम कॅम्पाकडे भरण्यांत यावी.** |
| | b. The non-forest land proposed for CA Shall be transferred and mutated on favour of the State Forest Department | विभागीय वनअधिकारी, रत्नागिरी (चिपळूण) स्थित रत्नागिरी यांनी सदर अटीनुसार पर्यायी वनीकरणासाठी मौ. तिवरे ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथील वनेत्तर ग. नं. १६३१, १६४८/१, १६४९/४, १६६१/१, १६६२, १६६४, १६६५, १६७४, १६७५, १६७६ मधील एकुण ४१.५२६२ हे. **क्षेत्र वनविभागाचे ताब्यात घेण्यांत यावे व त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करून पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.** |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | c. If the requisite number of plants 1000/ ha cannot be planted on non-forest land identified for taking up CA, then the balance number of plant will be planted in degraded forest land as per provisions of Woking Plan. | विभागीय वनअधिकारी, रत्नागिरी (चिपळूण) स्थित रत्नागिरी यांनी सदर अटीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करून पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. |
| iv | The cost of compensatory afforestation at the prevailing wages rates as per Compensatory afforestation scheme and the cost of survey, demarcation and erection of permanent pillars if required on the CA land shall be deposited in advance with the Forest Department by the project authority. The CA will be maintained for 10 years. The Scheme may include appropriate provision for anticipated cost increase for work scheduled for subsequent years | विभागीय वनअधिकारी, रत्नागिरी (चिपळूण) स्थित रत्नागिरी यांनी सदर अटीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करून पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. |
| v | NPV:<br>a. The State Government shall charge the Net Present Value (NPV) for the 39.25 ha forest area to be diverted under this proposal from the User Agency as pet the orders of the Hon'ble Supreme Court of India dated 30/ 10/2002, 01/08/2003, 25/03/2008. 24/04/2008 and 09/05/2008 in IA No. 566 in WP (C) No. 202/1995 and as per the guideline issued by the Ministry vide letters No. 5-1/1998-FC (Pt.II) dated 18/09/2003, as well as letter No. 5-2/2006-FC dated 03/10/2006) and 5-3/2007-FCdated 05/02/2009 in this regard; | मुख्य वनसंरक्षक (प्रा), पुणे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर व महाराष्ट्र शासन यांनी शिफारस करताना वळतीकरण करावयाच्या वनक्षेत्राची इको व्हॅल्यु क्लास- II, दाट जंगल याप्रमाणे प्रती हेक्टर रक्कम रूपये ९,३९,०००/- प्रमाणे ३९.२५ हे. क्षेत्राचे नक्त वर्तमान मुल्य रक्कम **रूपये ३,६८,५५,७५०/- (अक्षरी रक्कम रूपये तीन कोटी अडुसष्ठ लाख पंचावन्न हजार सातशे पन्नास फक्त)** इतकी रक्कम कॅम्पाकडे भरणा करण्यांत यावी. |
| | b. Additional amount of the NPV of the diverted forest land, if any, becoming due after finalization of the same by the Hon'ble Supreme Court of India on receipt of the report from the Expert Committee, shall be charged by the State Government from the user Agency. The user Agency shall furnish an undertaking to this effect; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| | c. Since it is mentioned that there is violation of Forest (Conservation) Act, 1980, action may be taken by the State Government as per Ministry's guideline dated 29.01.2018: | वळतीकरण करावयाच्या वनक्षेत्रापैकी ०.०५७८ हे. वनक्षेत्रावर वन (संवर्धन) अधिनियम १९८० चा भंग झालेला आहे. तरी त्यानुसार वनभंग झालेले क्षेत्र ०.०५७८ हे. क्षेत्राची NPV पाच पटीने म्हणजेच ०.२८९ हे. बाबत इको व्हॅल्यु क्लास- II, दाट जंगल याप्रमाणे प्रती हेक्टर रक्कम रूपये ९,३९,०००/- प्रमाणे ०.२८९ हे. क्षेत्राचे नक्त वर्तमान मुल्य रक्कम रूपये २,७१,३७१/- होत आहे त्यावर १२% साध्या दराने व्याज हे रक्कम रूपये ३२,५६५/- प्रती वर्ष होत आहे. तसेच त्यावर दंडित नक्त वर्तमान मुल्य १९९५ ते २०२० पर्यंत २५ वर्ष होतात म्हणून त्याचे व्याज हे रक्कम रूपये ८,१४,१२५/- होत आहेत. म्हणून वनभंग झालेमुळे होणारी रक्कम ही रूपये २,७१,३७१/- व त्यावरील व्याज हे ८,१४,१२५/- रूपये असे एकुण रक्कम **रूपये १०,८५,४९६/- (अक्षरी रक्कम रूपये दहा लाख पंच्याऐंशी हजार चारशे शहान्नव फक्त)** इतकी रक्कम कॅम्पाकडे भरणा करण्यांत यावी. |
| vi | User agency shall restrict the felling of trees to minimum number in the diverted forest land and the trees shall be felled under the strict supervision of the State Forest Department and the cost of felling of trees shall be deposited by the User Agency with the State Forest Department. | वनक्षेत्रपाल- शिरोता यांनी सदर प्रस्तावामध्ये वृक्षतोडीसाठी आवश्यक ४५ वृक्ष तोड करणेसाठीचे अंदाजपत्रकानुसार आवश्यक रक्कम रूपये ८१,७३०/- (एक्याऐंशी हजार सातशे तीस फक्त) होत आहेत. तरी सदर रक्कमेचा उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचे नावे डी. डी. (Demand Draft) या कार्यालयास सादर करावा. तसेच सदर अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करावे. |
| Vii | All the funds receved from the user agency under the project shall be transferred/deposited to CAMPA fund only through e-portal (https;//parivesh.nic.in/); | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| Viii | The complete compliance of the FRA, 2006 shall be ensured by way of prescribed certificate from the concerned District Collector; | सदर अटी पुर्ततेबाबतचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| Ix | Residential building/ buildings proposed for staff in Forest land sought for diversion should be shifted from Forest land to the non-forest land; | सदर अटीनुसार रेसिडेन्शियल बिल्डींग व [illegible] बिल्डींग वनक्षेत्राचे बाहेर वनेत्तर क्षेत्रामध्ये प्रस्तावीत करावी व त्यानुसार सुधारित नकाशा व इतर कागदपत्रे सादर करावीत. |
| X | User Agency shall obtain Environmental Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act, 1986, if applicable; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| xi | The layout plan of the proposal shall not be changed without prior approval of Central Government; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| xii | No labour camp shall be established on the forest land; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| xiii | Sufficient firewood, preferably the ulternate fuel, shall be provided by the User Agency to the labour after purchasing the same from the State Forest Department or the Forest Development Corporation or any legal source alternate fuel; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| Xiv | The boundary of the diverted forest shall be suitably demarcated on ground at the project cost, as per the directions of the concerned Divisional forest officer. | प्रस्तावीत ३९.२५ हे. वनक्षेत्राची लांबी ४४२० र. मी. होत आहे. सदर लांबीमध्ये प्रती ५० मीटर मध्ये एक पिलर याप्रमाणे एकुण अंदाजे ९० पिलर्स लावणेसाठी प्रती पिलर्स रक्कम रूपये ३२००/- प्रमाणे **एकुण २,८८,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त)** होत आहेत सदरची रक्कम कॅम्पाकडे चलनाने भरणा करावी. सदरची प्रति पिलर्स रक्कम ही मुख्य वनसंरक्षक (संधारण), म. रा. नागपूर यांचेकडिल पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/२/३६३२, दि. ०९/१२/१९९७ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेमधील सन २०१७-१८ चे प्रती वर्ष १० टक्के वाढीव दराने म्हणजे सन २०१९-२० साठी २० टक्के वाढीव दराने प्रस्तावीत करण्यांत आलेली आहे. |
| Xv | No additional or new path will be constructed inside the forest area for transportation of construction materials for execution of the project work; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| Xvi | The period of diversion under this approval shall be co-terminus with the period of lease to be granted in favour of the user agency or the project life, whichever is less; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| Xvii | The Forest land shall not be use for any purpose other than that specified in the project proposal; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| Xviii | The Forest land proposed to be divered shall under no circumstances be transferred to any other agencies, department or person without prior approval of Govt. of India; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| Xix | Violation of any of these conditions will amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken as per the MoEF&CC Guideline F. No 11-42/2017-FC dt 29/01/2018; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| Xx | Any other condition that the Ministry of Environment, Forests & Climate Change may Stipulate from time to time in the interest of conservation, protection and development of forests & wildlife; | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |
| xxi | The compliance report shall be uploaded on e-portal (https;//parivesh.nic.in/) | अट मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे. |

वरील रक्कमा हया सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील रेडी रेकनर दराप्रमाणे आहेत. तरी सदरच्या रक्कमा हया सन २०१९-२० या आर्थिक वर्षातच कॅम्पाकडे भरणा करावयात व उपरोक्त अटींची पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. अन्यथा नवीन आर्थिक वर्षाच्या वाढीव रक्कमा भराव्या लागतील याची कृपया नोंद घ्यावी. आपला अटी पुर्तता अहवाल या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर अंतिम मंजूरीस्तव सदर अहवाल यथोचित मार्गाने केंद्र शासनास सादर करण्यांत येईल.

सोबत - वरीलप्रमाणे.

(श्रीलक्ष्मी ए.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग, पुणे.

प्रतिलिपी - मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांना वरीलप्रमाणे माहितीस्तव सविनय सादर.

प्रतीलिपी- विभागीय वनअधिकारी, रत्नागिरी (चिपळूण) स्थित रत्नागिरी यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

२/- त्यांना कळविण्यांत येते की, वरील प्रमाणे केंद्र शासनाचे अट क्र. iii (b), iii (c) व IV मध्ये दिलेल्या सुचनानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करून अटी पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत- १. सहा. वनसंरक्षक (सांख्यिकी), पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.
२. वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता. यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner